2022 - 2023

October-November 2022 E-ISSN – 2348-7143

International Research Fellows Association's


RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Issue-306

Multidisciplinary Issue



Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's M.S.G. Arts, Science & Commerce College,
Malegaon (Camp), Dist – Nashik [M.S.] India.

Executive Editors :
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)

October-November 2022 E-ISSN – 2348-7143

International Research Fellows Association's

RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Issue-306

Multidisciplinary Issue

Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's M.S.G. Arts, Science & Commerce College,
Malegaon (Camp), Dist – Nashik [M.S.] India.

Executive Editors :
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible, answerable and accountable for their content, citation of sources and the accuracy of their references and bibliographies/references. Editor in chief or the Editorial Board cannot be held responsible for any lacks or possible violations of third parties' rights. Any legal issue related to it will be considered in Yeola, Nashik (MS) jurisdiction only.

- Chief & Executive Editor

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : **www.researchjourney.net**

***Cover Photo :** From the Paper 'Preservation of Myxomycetous Biodiversity from Navegaon Bandh, Dist. Gondia, Maharashtra (India) : II, N. V. Chimankar.

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 1000/-

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue 306: Multidisciplinary Issue
Impact Factor : 6.625 (SJIF) Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Oct.-Nov.-2022

'अधिवास' : सुंद्राचा संघर्षमय जीवनप्रवास

प्रा. मदने रोहिणी बबन

मार्गदर्शक
डॉ. ज्ञानेश्वर अंबादास वाल्हेकर
अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालय, ओतूर.
ता.जुन्नर,जिल्हा–पुणे.पिन-४१२४०९ मो. ७५८८०६९०१०
Email- rohinimadane15@gmail.com

बाबू बिरादार ह्यांची सातवी कादंबरी **'अधिवास'** ही २०२१ साली गणगोत प्रकाशाने प्रकाशित केली. 'अधिवास' मध्ये सुंद्राभोवती कादंबरीचे कथानक फिरते. आशयाच्या अनुषंगाने ही कादंबरी म्हणजे सुंद्रासारख्या स्त्रियांच्या अनुभवविश्वाचा परीघच म्हणावा लागेल. या कादंबरीची नायिका या 'सुंद्रा' हिचा जीवनप्रवास व अनेक घटना, प्रसंग, तिच्या मनाची उलथापालथ, सुखदुःखाची सांगड घालत आपले जीवन जगण्याचा तिचा अट्टाहास आपल्याला पहावयास मिळतो.

आशय:

या कादंबरीत एकूण ७०-८० घरांचे कामुनी गाव आहे. या गावात गब्रु पाटलाचा मोठा वाडा आहे. याच गावात गणपती, नरसिंगा, माणिका, लक्ष्मण हे चार भावांचे कुटुंब राहते. नरसिंगा व रंगुबाई यांची मुलगी सुंद्रा आहे. गणपती हा भावांमध्ये सर्वात लहान आहे. शरीराने आवाढव्य असणाऱ्या आपल्या भावांना व त्यांच्या बायकांना गणपती सांभाळत होता. त्यांना अन्न पाणी कमी पडू नये याची काळजी घेत होता. सदैव जागृत राहून आपल्या भावांना शहाणे होऊ देत नव्हता. स्वतः मात्र अडाणीपणाचा आव आणून हुशारीने कुटुंबाची जबाबदारी घेत होता. सर्वांना आपलेसे करत होता. नरसिंगा व रंगुबाईची मुलगी सुंद्रा मोठी होऊ लागली होती. एकदा सुंद्राचे लग्न झाले की सगळी जायदाद आपली होईल. या विचारानेच गणपती जीवनाचे आराखडे आखत होता आणि तसा वागत होता. बाहुलीसारखी सुंद्रा मोठी होती. सुंद्रा रूपाने सुंदर होती.जेमतेम उंची, काळा-सावळा रंग, मजबूत अंगकांठी सुंद्रा मोहक होती. सुंद्राच्या लग्नाची बोलणी गणपती आपल्या भावांसमोर करतो आणि भाऊदेखील सुंद्राच्या लग्नाची सगळी जबाबदारी गणपतीवर टाकून मोकळे होतात. अशाप्रकारे त्याच्या हिप्परगाच्या नवनाथ पाटलाच्या वाड्यात देवरायाबरोबर सुंद्राचा संसार सुरू होतो. हसणारी, खेळणारी, बागडणारी लहान बाहुलीसारखी सुंद्रा सासरीही अशीच वागू लागते. आपला पती देवरायाबरोबर नवरा-नवरीचा खेळ खेळू लागते. वयाने दोघेही लहान असल्याने हसण्या-बागडण्यातच त्यांचा संसार फुलू लागतो. एकदा देवराया घरात नाही म्हणून सुंद्राची सासू हंबरडा फोडते. विहीर, माळ, शेत-शिवारात शोधाशोध सुरू होते.

देवरायाचा आडात पडून मृत्यू होतो आणि सुंद्रा बालपणीच विधवा होते. नवरा देवराया मरताच लहानशी सुंद्रा कामुनी गावाला पुन्हा आपल्या माहेरी येते. वाढत्या ऋतूबरोबर सुंद्रा जसजशी मोठी मोठी होवू लागते तशी गणपतीला दिवसेंदिवस सुंद्राच्या विचाराने अस्वस्थ वाटायला लागते आणि म्हणूनच तो तिचे लग्न करण्याचे ठरवतो. चिल्लम खोऱ्याच्या लिंबूरच्या रामचंद्र पाटलाचा भाऊ अप्पारावशी सुंद्राचे लग्न लावण्याच्या विचारात असतो. अप्पारावाचे पहिले लग्न झाले होते. त्याची बायको पोचव्वा तेलंगीला निघून

गेली होती. अप्पाराव एकटा पडतो. माझ्या बायकोला परत आण! नाहीतर माझे दुसरे लग्न लावून तरी दे ! असे तो आपल्या भाऊ रामचंद्र पाटलाला म्हणत होता. अशाप्रकारे सुंद्राचे अप्पारावशी लग्न होते आणि सुंद्राबाईपाटलीन म्हणून तिचा वाड्यात प्रवेश होतो. रामचंद्र पाटलाची बायको महालनबाई सुंद्राला जीव लावत असे मात्र वाड्यातील गुढ, अगम्य प्रतीकांचे सुंद्राला आश्चर्य वाटे. सुंद्राचे लग्न होऊन दोन दिवस झाले तरी आपला पती अप्पारावाचे तिला अजून वाड्यात दर्शन झाले नव्हते. सुंद्रा मात्र वाड्यात बिनधास्त वावरत होती. आपण कुणा वेगळ्याच मुलखात आलो आहोत याचे तिला वाईट वाटे नसे. तर आपली आई रंगुबाईचे बोल आठवून ती स्वतःला वाड्यात रमवत होती. आपली बायको सुंद्राला घाबरून अप्पाराव मात्र शेतावरच जाऊन बसत असत. इकडे रामचंद्र पाटील वारंवार लच्छा नोकराला पाठवून त्याला घेऊन आणण्यास सांगत असे. अप्पाराव मात्र हे सर्व टाळत होता. एकदा न राहून सुंद्राने अप्पारावला विचारले नदीच्या तोंडात रोज झोपताव... वाड्यावर झोपत जावा की.. पण रानातल्या जनावरांबरोबर कोण झोपेल अशी सबब सांगून तो टाळत होता. पण आपली पहिली बायको जशी निघून गेली तशी सुंद्राही जाऊ नये अशी भीतीही त्याच्या मनात होती. दिवसेंदिवस कामुनी गावची सुंद्रा ही वाड्यात रमली होती. आपले तन- मन वाड्याला सोपवणाऱ्या सुंद्राला दिवस जातात. सुंद्रा आणि अप्पादादाला मुलगी होते. आता मात्र अप्पादादा दररोज वाड्यावर येऊ लागला होता. सगळं सुरळीत चालू असताना अचानक नदीचे पाणी वाढू लागते आणि नदीला पूर येतो. पुराच्या पाण्यात शेतावरचा अप्पादादा नदीच्या पुरात वाहून जातो. वाड्यात एकच आक्रोश होतो. सुंद्राचे कुंकू जाते. सुंद्रा पुन्हा विधवा होते. अप्पादादाच्या जाण्याने रामचंद्र पाटील एकाकी पडतो. पाटलाचं मन सैरभैर होते, इकडे सुंद्रा मन घट्ट करीत होती. पुराच्या पाण्यात आपला नवरा वाहून गेला हा नियतीचा खेळ समजून स्वतःला सावरत होती. आपल्या मुलीला वाढवणार या निष्ठेने ती जगत होती. सुंद्राची पोरगी मन्या वाड्यात रांगू लागली. मन्या सुंद्रासारखीच काळीसावळी, उभट नाकाची तसेच सुंद्राच्या गालावरचा तिच्या डोळ्याकडे सरकलेला होता.

अनेक अघटित घटना जवळ बाळगून सुंद्रा पोरीला घेऊन वाड्यात राहात होती. अनेक अतर्क्य कहाण्यांनी वाडा भरला होता. अशातच सुंद्राला पुन्हा एक अघटीत घटनेला सामोरे जावे लागते ते म्हणजे एका रात्री रामचंद्र पाटलाचा खून होऊन त्याचे शरीर वाड्यात पडते. सुंद्रा घाबरते. मुलीला घेऊन पळत सुटते. नदी पार करून दिवस उजाडताच आपल्या माहेरी कामुनी गावाला येऊन पोहोचते. अशाप्रकारे सुंद्रा पुन्हा माहेरी येते. हे पाहून गणपती मात्र अस्वस्थ होतो. दिवस जात होते सुंद्राची मुलगी मोठी होऊ लागली. सुंद्रा आता माहेरी हवं नको ते सगळ्यांना पहात होती. घराची जबाबदारी घेऊन घर चालवत होती. सगळ्यांना समजून घेत होती. कारभारी गणपतीही तिचे ऐकत होता. कारभारी गणपतीच्या मनात सुंद्राच्या मुलगी मन्याच्या लग्नाचा विचार घोळू लागतो. माहेरचा आसरा घेण्यास आलेल्या मायलेकींना दूर करू नकोस. बाबा! असे सुंद्रा गणपतीला म्हणत गणपतीने सुंद्राची मुलगी मन्याची सोयरीक वाघोटीला जयवंत पाटील यांच्या घराण्यात केली. जयवंत पाटीलाची पहिली बायको वारली होती. जयवंत पाटलाला बरोबर मन्याचं लग्न होते आणि अशाप्रकारे ती जयवंत पाटलाची बायको होते. लग्नाला चार दिवस झाले तरी अजून वाघोटी गावचा मुऱ्हाळ कामुनी गावाला आले नाही म्हणून सुंद्रा चिंतेत पडते. लेकीच्या काळजीने सुंद्राचा जीव कासावीस होते. म्हणून सुंद्रा आपली आई रंगुबाईला सांगून आपल्या मुलीला भेटण्यासाठी वाघोटी गावाला जाते. शंभर-सव्वाशे एकरचा मालक असलेला जयवंत पाटील याला जीवनाकडून कसलीही अपेक्षा नसते. आपल्याला वडिलोपार्जित जे मिळाले त्यात तो समाधानी होता. जयवंत पाटलाचे सारे शेत कर्जात होते साऱ्या शेताचा शेतसारा माणिकराव पाटील भरत होता. सर्व शेत दुसऱ्याच्या ताब्यात असल्याने वेळेवर पेरणी नाही पिकलं पिकलं नाही तर गेलं! या हिशोबाने जयंत पाटील दुर्लक्ष करीत होता. मन्याची आई सुंद्रा मन्याचा संसार सावरू लागली. शेतावर लक्ष देऊ लागली. हवं नको ते पाहू लागली. सोन्यासारखी आपल्या लेकीचे आपल्यासारखेच होऊ नये. म्हणून ती मन्याला सावरत असत. जयवंत जावयाचे मात्र संसारात लक्ष नाही, शेत शिवारातही नाही हे

सुंद्राच्या लक्षात आले होते. पंधरा दिवस, महिना झाला तरी सुद्धा दोघांची एकमेकांवर सावली नाही, याची सुंद्राला चिंता वाटू लागली. पुरुषासारखा पुरुष पण घराची आस नाही की मन्याची ओढही नाही. या विचाराने सुंद्रा चिंतेत असत. आपलं सगळं सुखदुःख आपल्या आईच्या स्वाधीन करून मन्या निश्चिंत होती. दरम्यान मन्याला दोन मुले होतात. नारायण आणि पद्मिनी सुंद्रा आता गावची पाटलीन झाली होती. कोणाचे डोळे आले, कुणाचे लेकरू दूध पीत नाही, कुणाची दारू सोडावावी प्रत्येक कामात सुंद्राचा पुढाकार असे. आता ती रात्रीचे शिवारात फिरू लागली. हळूहळू जमीन ताब्यात घेऊन शेती करु लागली. जमीन सोडवण्यासाठी कोर्ट-कचऱ्यामध्ये चकरा मारू लागली. दारापुढे बैल, चंद्री म्हैस, पिकलेल्या शेत-शिवाराने फिरू लागली.

मन्याचा संसार उघड्यावर पडून नये म्हणून ती हरएक प्रयत्न करू करताना दिसते. जीवाचे रान करते. एखाद्या कर्त्या पुरुषाप्रमाणे सर्व शेत शिवार ताब्यात घेऊन सगळयांच्या पायवाटा ती बंद करते. मन्याही आपल्या आईबरोबर खांद्याला-खांदा देऊन काम करीत असे. सुंद्रा मात्र सगळी जबाबदारी घेत होती लगिन घर असो किंवा मरणघर असो तिच्याशिवाय पान हलत नसे. सगळया गावाला जणू तिचा आसरा होता. अनुभवाने शहाणपण आलेली सुंद्रा एक एक पाऊल हुशारीने टाकत होती. लेकीचा संसार हुशारीने करत होती. संसारातील सुखदुःखे कोणाला नाही मन्या! हेही दिवस जातील. घराला एक दिवस कळेल. आपण देवाच्या दरबारातील पुजारी आहोत. असे मन्याला समजावत होती. सुंद्रा सर्व जाणत होती. सुंद्राच्या मनात लेकीचे घर बांधण्याचा विचार होता. कारण स्वयंपाक घर सोडलं तर सारे घर मोकळेच होते. मन्याही आता कामाचा भार घेऊ लागली होती.

मन्याचे सगळे मार्गी लागत असताना एके दिवशी अचानक आग्या मोहोळांचा झुंडका जयवंतरावाच्या अंगावर येतो आणि त्याचा मृत्यू होतो. नारायणराव पद्मिनी ही दोन मुले पोरकी होतात. मन्याचं कुंकू नाहीसं होते. वयपरत्वे अनुभवाने परिपक्व होत असलेली सुंद्रा खंबीरपणे मन्याला सावरत होती. जयवंतराव पाटील गेले तेव्हा मन्याचे वय वीस-पंचवीस होते. आता आपण तिच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे असे सुंद्राला वाटत होते. दरम्यान सुंद्राच्या आई-वडीलाचाही मृत्यू होतो. आपल्या माहेराला जणू सुंद्रा विसरली होती. आता दिवस उगाताच दोघी शेतात असायच्या. सगळी कामे दोघी मिळून करायचा. सगळे गाव आता सुंद्राबाईचे कौतुक करत होते. शेती करावी तर सुंद्राबाईप्रमाणे करावी असे म्हणत होते. कुणाच्या घरी लग्न असो सुंद्राबाई पाटलीन वरमाई असे. एवढेच नव्हे तर मढ्याच्या कपाळावरचा चांदीचा रुपया देखील सुंद्राबाई पाटलीनचा असे. सुंद्राबाईने गुलाबरावकडून जमीन काढून घेतली होती. अशी कितीतरी महत्वाची कामे यशस्वी पार पाडून आपल्या लेकीचा सोन्याचा संसार फुलवित होती. तिच्या भविष्याचे आराखडे आखत होती. एखादी वाघीण बनवून सगळया संकटांना पुरुषाप्रमाणे तोंड देत होती. या पुरुषांचा एकट्या जगात आपल्या मन्याचा निभाव लागला पाहिजे. त्यासाठी जमीन मिळवण्यासाठी प्रसंगी भांडायला देखील ती तयार होती. वर्षे लोटत गेली सुंद्रा कोर्टाकडे चकरा मारत होती. आपला नातू नारायणाने शिकावे, जबाबदारी घ्यावी असे सुंद्राला वाटायचे. प्रसंगी ती नारायणला कडक शिस्तीचे धडेही देत होती. वडिलांप्रमाणे नारायण उदासीन होऊ नये. तसेच करारी, धीटपणा त्याच्यात यावा म्हणून प्रसंगी ती नारायणाला मारते देखील. पद्मिनीही आता मोठी होऊ लागली होती. सुंद्राला आता तिची काळजी वाटू लागते आणि नातीच्या लग्नाची जबाबदारी आपल्यावर आहे असे तिला वाटू लागते. म्हणून सुंद्रा आपल्या माहेरी कामुनी गावाला सोयरीक करण्याचा विचार करते. सुंद्राआत्या म्हणणारा हनुमंता पुढे येतो आणि आपल्या मुलाशी लग्न करण्याचा सुंद्रा समोर प्रस्ताव मांडतो. सुंद्राही तयार होते.

अशाप्रकारे हनुमंताचा मुलगा बापूरावांशी पद्मिनीच्या विवाह होतो. नारायणही आता मोठा होऊ लागला. आजीबरोबर कोर्ट-कचऱ्यामध्ये जाऊ लागतो. जबाबदारीने वागत असतो. दिवस जात होते तशी सुंद्राबाई आता खंगत चालली होती. एकदा नारायण सुंद्रा आजीला आपल्या कोर्टाची केस जिंकल्याचे सांगून तिच्या हातावर गुळाची शेरणी देतो. सुंद्रा निश्चिंत होते. आता आपण मृत्यूच्या वाटेला चालत आहोत असा जणू तिला भास होतो. आपल्या लेकराचे सगळे व्यवस्थित मार्गी लावून तिच्या उज्वल भविष्याची जुळवाजुळव

करत तिचा देह तिला आता थकलेला वाटतो आणि ती आजारी पडून अंथरुणाला खिळते. अशातच वाड्याचा बुरुज ढासळतो तिच्या भोवती पडतो. सगळे जागीच स्तब्ध उभे राहतात. सुंद्रा मात्र पडलेल्या धुराड्यात तशीच झोपून राहते आणि मरणाला सामोरे जाते.

अशाप्रकारे निढर होऊन अनेक संकटांना सामना करणाऱ्या सुंद्राचा मृत्यू होतो. आपले तन-मन सर्व मन्याच्या संसारासाठी अर्पण करून सुंद्रा निश्चिंत मनाने जगाचा निरोप घेताना दिसते.

एकूणच या कादंबरीत आपल्या आयुष्याची झालेली फरपट लेकीच्या वाट्याला येऊ नये म्हणुन आपले संपूर्ण जीवन लेकीसाठी अर्पण करताना दिसते. शेवटी दिलासादायक आनंद मृत्यूच्या वाटेवर तिला मिळतो. परिस्थितीने शहाणपण आलेली सुंद्रामध्ये वेगळेच करारी रूप पाहावयास मिळते आणि म्हणूनच आपल्या लेकीच्या सुखद भविष्याची मांडणी आखून समजूतदारपणे पाऊल टाकताना दिसते. एकूणच या कादंबरीत सुंद्राचा जीवनाचा आलेख संघर्षमय जीवनाकडून सुखददायक मृत्यूच्या प्रवासाकडे चाललेला दिसतो.

बाबू बिरादार ह्यांनी 'अधिवास' या कादंबरीत ग्रामीण खेडे. खेड्याची रचना, खेड्याची संस्कृती, व्यवसाय, कृती-मनोकृती, ग्रामीण जातीनिहाय रचनातंत्र, परंपरानिष्ठ ग्रामरचना, स्वार्थ वृत्ती, अत्यंत तटस्थपणे लेखकाने रेखाटले आहे. सुंद्राच्या जीवनातील चढ-उतार,व सुख-दुःखाना यशस्वीपणे लढा देऊन त्यातून मार्ग काढणारी सुंद्रा निश्चितपणे वाचकांना भावते. परंपरानिष्ठ संकेतांना शोध प्रारब्धवादी मुल्यांच्या ओझ्याखाली दबलेल्या मनोवृत्तीचे तसेच त्यातून संघर्ष करून मार्ग काढणाऱ्या सुंद्राचे जीवनविश्व लेखकाने अत्यंत प्रभावीपणे रेखाटलेले आहे. जीवनाबद्दलचे समंजस भान सुंद्रामध्ये पहावयास मिळते. एकूणच या कादंबरीत आपल्या वाट्याला आलेले दुःख, वेदना आपल्या मुलीच्या वाट्याला येऊ नये, म्हणून सुंद्रा संघर्ष करताना दिसते. वयपरत्वे वाढत जाणारे तिचे शहाणपण जीवन जगण्याची कला शिकवून जाते. सुखदुःखांच्या वाटचालीत स्वतःला झोकून देते. मार्ग काढताना दिसते.

एकूणच बाबू बिरादार ह्यांची ही कादंबरी म्हणजे सुंद्राचा जीवनानुभव व्यक्त होताना दिसते. 'अधिवास' मधील 'सुंद्रा' आपल्या संसाराची वाताहत झाली असली तरी आपल्या लेकीच्या सुखासाठी धडपडताना दिसते. आपले दुःख तिच्या वाट्याला येऊ नये म्हणुन जमीन सोडवण्यासाठी सुंद्राचा संघर्ष लेखकाने यशस्वीपणे अधोरेखित केला आहे. त्याच अनुषंगाने तेथील लग्न व्यवस्था, दळणवळण, जीवनपद्धती यावरही लेखकाने प्रकाश टाकला आहे. एकूणच 'अधिवास' मध्ये स्त्रियांच्या संघर्षाचा प्रवास त्यांच्या भावभावनांचा आलेख अत्यंत उठावदारपणे आलेला आहे. त्यात ओघाने आलेले ग्रामव्यवस्थेचे प्रखर वास्तव तर येतेच व समाजाची संस्कृती रुढी-परंपरा, नीती-अनीती, शकुन-अपशकुन या अनुषंगाने बाबू बिरादार ह्यांच्या कादंबरीला उठाव आलेला दिसतो.

एकूणच जी. ए. कुलकर्णी, चि. त्र. खानोलकर यांचा प्रभाव असलेले बाबू बिरादार ह्यांनी मानवी स्पंदनाचा सूक्ष्म वेध घेऊन भोवतालच्या ताण-तणावासहित वास्तवादी चित्रण 'अधिवास' या कादंबरीत केले आहे.

एकूण कृषी संबंधित पेरणी, खुरपणी, नांगरणी, कापणी, मळणी, दुष्काळ, पूरपरिस्थिती, सावकार, विहीर, नदी, सत्ताधारी समाज त्यातून आलेले तत्कालीन समाजजीवन लेखकाने प्रत्येकारी रेखाटलेले आहे. रंगुबाई, सुंद्रा, मन्या, पद्मिनी या एकाच पिढीतील स्त्रीयांच्या मनातील भावनांचे कंगोरे लेखक यशस्वीपणे अभिव्यक्त करताना दिसतात. खरे तर या शेतात राबणाऱ्या कष्ट करणाऱ्या स्त्रिया आहेत. परंपरेनिष्ठ जीवनशैली जगणाऱ्या आहेत. पण त्यातून वाट काढीत संसारात आलेल्या दुःखाकडे तटस्थपणे पाहणारी सुंद्रा वाचकांना निश्चितपणे भावते. तिच्यात असणारी सोशिकता, सहनशीलता, अनुनय, समायोजन, पराधीनता कौताकास्पद वाटते. या पुरुषप्रधान संस्कृतीत एका विधवा स्त्रीकडे पाहणारा दृष्टीकोन तिने ओळखला आहे आणि म्हणूनच ती जगण्यासाठी निश्चित दिशा ठरवून, स्थितीगतीचा समन्वय साधून धीटपणे मार्ग काढताना दिसते. सुंद्राच्या आत्मनिवेदनातून ही कादंबरी फुलत जाते. शोषित परंपरेला तडा देत परिवर्तनाची आस सुंद्रा बाळगणारी

असह्य परिस्थितीशी रडगाणं न गाता निकराचा सामना करून मार्ग काढताना दिसते. सुंद्राची संघर्षमय प्रेरणादायी जीवनकहानी यशस्वीपणे रेखाण्यास लेखकास यश आले आहे. नित्याचे पेचप्रसंग त्यावर सुंद्राने धाडसाने केलेली मात..असे काही संदर्भ कथानकाला वेग देतात. प्रभावी बोलीभाषा आणि प्रवाही संवादीपणा यामुळे कादबरीला उठाव आला आहे.

पात्रे:

'अधिवास' मध्ये ग्रामीण कुटुंब व्यवस्था प्रामुख्याने येते. दररोजच्या जीवनात संसाराची वाट चलत असताना अनेक गुण नितीमूल्यांची सांगड घालत शेतात काबाडकष्ट करणारी ही साधी –सरळ माणसे येतात. त्याचबरोबर जीवनात सुख दु:खातील गुंतागुत व त्यांच्या अपेक्षा, इर्षा,ताण-तणाव तर कधी शोकांतिका भावनांच्या माध्यमातून बाबू बिरादार चपखलपणे रेखाटतात.त्याचबरोबर शेतकरी जीवन व जात–पात, मानव- मानव संबंधाच्या पातळ्या, निसर्ग आणि मानव यांची सांगड घालण्याचा बाबू बिरादार यांनी यशस्वी प्रयत्न केला आहे.त्यामुळे 'अधिवास' पात्रे उठावदार व प्रभावी वाटतात.

- **सुंद्रा**

'सुंद्रा' ही या कादंबरीची नायिका आहे. तिच्या जीवन प्रवासातील चढ-उतारांचा आलेख आपल्याला या कादंबरीत पहावयास मिळतो. अनेक घटना, प्रसंग मनाची उलथापालथ, सुखदु:खाची सांगड घालत आपले जीवन जगण्याचा अट्टाहास सुंद्रांमध्ये पाहावयास मिळतो. गावातील सुंद्रा ही चार भावांच्या कुटुंबापैकी रंगुबाई आणि नरसिंगा यांची मुलगी आहे. वयाने लहान सुंद्रा रूपाने सुंदर होती. काळा-सावळा रंग, भरलेली अंगकाठी सुंद्रा दिसायला मोहक होती. आपल्या आईच्या कानावरील मोस तिच्या उजव्या गालावर सरकला होता. अशा सुंद्रांचे आठ-दहा वयाची असतानाच लग्न होते आणि हिप्परग्याच्या नवनाथ पाटलाच्या वाड्यात लहानग्या सुंद्राचा संसार सुरू होतो. हसणारी, खेळणारी, बागडणारी, लहान बाहुलीसारखी सुंद्रा ही आपला पती देवरावबरोबर नवरा-नवरीचा खेळ खेळत असे. वयाने दोघेही लहान असल्याने हसण्या बागडण्याच्या वयातच दोघांचा संसार फुलू लागतो. एकदा देवराव घरात नाही म्हणून त्याची आई हंबरडा फोडते. आडात पडून देवरावचा मृत्यू होतो. नवरा देवराव मरताच लहानगी विधवा सुंद्रा पुन्हा आपल्या माहेरी कामुनी गावाला येते. या ऋतुबरोबरच सुंद्राही मोठी होऊ लागली जेमतेम उंची, आणि काळीसावळी सुंद्रा दिसायला मोहक होती. घराचा कारभार सांभाळणाऱ्या गणपतीने सुंद्राचे लग्न चिल्लमखोरीच्या लिंबूरच्या रामचंद्र पाटलाचा भाऊ अप्पादाबरोबर लावून दिले. सुंद्राला पहिल्या लग्नाच्या आठवणी फारश्या नसल्याने आपण दुसरे लग्न करायला चाललो आहोत. याचे तिला सोयरसुतक नसते. उलट तरुण सुंद्राच्या मनात आपल्या नवऱ्याविषयी आकर्षण प्रेम दिसत होते. अगदी स्थितप्रज्ञ असलेली सुंद्राच्या मनाला लग्नाची ओढ होती. अशा प्रकारे सुंद्राचे लग्न रामचंद्र पाटलाचा भाऊ अप्पादाबरोबर होते आणि एका भल्यामोठ्या वाड्याची ती मालकीण होते. वाड्यातील अनेक अशुभ घटकांनी, प्रसंगांनी सुंद्रा घाबरते तरीही स्वत:ला समजावत ती वाड्यात राहत होती.

सुंद्राचे लग्न होऊन दोन-तीन दिवस झाले पण तिला आपला पती अप्पारावचे दर्शन वाड्यात झाले नाही. कधीकधी तिला वाटते आपण वेगळ्याच मुलखात आलो आहोत तर कधी आपली आई रंगुबाईच्या सांगितलेल्या शब्दांना आठवत स्वत:ला रमवत असे. एकदा सुंद्राने मोठा धीर करून अप्पादाला म्हणजे आपल्या पतीला विचारले, "नदीच्या तोंडात रोज झोपताव.... वाड्यावर झोपत जावा कीऽ" एका नवविवाहित तरूणीच्या मनातील पतिविषयीची इच्छा-आकांक्षा आपल्याला सुंद्रीच्या या प्रश्नातून जाणवते. आपली पहिली पत्नी सोडून गेली. म्हणून सुंद्राही सोडून जाईल या भीतीपोटी तो केव्हातरी आठ-पंधरा दिवसाआड वाड्यावर येत असे. इतर दिवशी तो शेतावरच राखण करीत असायचा. अश्यातच आपले तन- मन वाड्याला सोपवणारी सुंद्रा गरोदर राहते आणि सुंद्रा व अप्पादाला एक मुलगी होते. अश्यातच अचानक नदीचे पाणी वाढून नदीला

पूर येतो आणि पुराच्या पाण्यातील जागलीवरचा अप्पादा वाहून जातो. सुंद्रा पुन्हा विधवा होते. तरीही आपल्या मुलीला वाढवणार, मोठे करणार, या विचाराने ती स्वतःला सावरते आणि निष्ठेने ती वाड्यात जगत रहाते. अनेक अघटित घटना, प्रसंग उरात बाळगून ती वाड्यात राहात होती. अशातच रामचंद्र पाटलाचा खून होतो. घाबरलेली सुंद्रा लहानग्या मुलीला घेऊन पळत नदी पार करून दिवस उजाडताच आपल्या माहेरी येते. माहेरीच वास्तव्यास असणारी सुंद्राची पोरगी मन्या मोठी होऊ लागली होती. वयात येऊ लागताच सुंद्राच्या मुलीची मन्याची सोयरिक वाघोटीला जयवंत पाटली घराण्यात होते. मन्याच लग्न झालं लग्नाला चार दिवस झाले तरी अजून वाघोटी गावचे मुऱ्हाळ कसे आले नाही म्हणून सुंद्राचा जीव कासावीस होताना दिसतो आणि आपली माय रंगुबाईला सांगून आपल्या मुलीला भेटण्यासाठी वाघोटीला जाते. आपला जावई संसारात उदासीन असल्याचा पाहून सुंद्राला आपल्या मुलीची चिंता वाटते आणि मोठ्या हिमतीने मन्याचा संसार सावरू लागते. शेतावर लक्ष देऊ लागते. हवं नको ते पाहू लागते. सोन्यासारखे आपल्या लेकीचे आपल्यासारखेच होऊ नये म्हणून ती मन्याला सावरताना दिसते. बघता बघता मन्याला दोन मुले होतात आणि कामुनी गावची सुंद्राही वाघोटी गावची सुंद्राबाई पाटलीन होते. सुंद्राबाई पाटलीन रात्रीचे शेत-शिवार फिरून देखरेख करीत असे. हळूहळू जमीन ताब्यात घेऊन ती शेती करू लागली होती. जमीन सोडवण्यासाठी कोर्ट-कचऱ्याच्या फेऱ्या मारत असे. मन्याचा संसार उघड्यावर पडू नये म्हणून ती हरएक प्रयत्न करीत असे. जिवाचे रान करीत असे. एखाद्या गड्यासारखं शेत-शिवार ताब्यात घेऊन सगळयांच्या पायवाटा तिने बंद केल्या होत्या.

सगळया गोष्टी सुंद्राबाई आपल्या मनालाच विचारून करत होती. आपण चुकलो तर सर्व चूक होईल म्हणून कोणतीही गोष्ट समोर येताच थांबून मागचा-पुढचा विचार करून वेळ काळाचा विचार भोगलेल्या, ऐकलेल्या मनाला तीनदा तीनदा विचार करून निर्णय घेत असे. त्यामुळे गावात काही अघटीत घडताच सुंद्रापाटलीनबाईला बोलवले जात असे. मन्याचा नवरा जयवंत पाटलाचे निधन झाल्यावर सुंद्राला अधिकच आपल्या मुलीची काळजी वाटते. या माणसांच्या जगात विधवा बाईचा निभाव लागावा म्हणून ती जबाबदारीने मागचे पुढचे आराखडे आखून मन्याचा संसारात पूर्णपणे झोकून देऊन स्वत: एखाद्या वाघिणीप्रमाणे सगळ्या संकटांना तोंड देत होती. जमीन मिळवण्यासाठी कोर्ट-कचेऱ्याही करत होती. प्रसंगी भांडायलाही तयार होती. वर्षे जात होती. इकडे नारायण पद्मिनीही मोठे होऊ लागले. पद्मिनीच्या लग्नाची जबाबदारीही सुंद्रा घेते. नारायणाला हुशार करण्यासाठी तिची धडपड दिसते. प्रसंगी ती त्याला मारहाण देखील करते. आपल्या वडिलांप्रमाणे तो उदासीन व मवाळ होऊ नये. तर हुशारी, शहाणपण त्याच्यामध्ये यावे यादृष्टीने ती प्रयत्न करताना दिसते. दिवस जातात तशी सुंद्राबाई पाटलीन म्हतारी होते.

एक दिवस नारायण सुंद्राआजीला आपण कोर्टाची केस जिंकल्याचे सांगून शेरणी हातात टेकवतो. सुंद्राबाई निश्चिंत होते. आपल्या लेकरांचे सगळे व्यवस्थित मार्गी लावून तिच्या उज्वल भविष्याची जुळवाजुळव करत एका निश्चिंत मनाने ती मृत्यूची वाट चालू लागते आणि जगाचा निरोप घेते.

एकंदरीतच वयपरत्वे अनुभवाने शहाणपण आलेली सुंद्रा आपल्यावर आलेली बिकट, विरक्त परिस्थिती आपल्या मुलीच्या वाट्याला येऊ नये म्हणून आपले सर्वस्व अर्पण करून मुलीच्या संसाराला यशस्वी रीतीने हातभार लावताना दिसते. आपल्या आयुष्यासारखी फरपट लेकीच्या वाट्याला येऊ नये म्हणुन आपले संपूर्ण जीवन लेकीसाठी अर्पण करताना दिसते. एक दूरदृष्टी विचार आणि संकटांना तोंड देण्याची ताकत सुंद्रामध्ये पहावयास मिळते.

कादंबरीच्या सुरुवातीला हसण्या-बागडण्यातील सुंद्रा कादंबरीच्या शेवटी मात्र एक धडाडी, कर्तुत्ववान, जिद्दी, कुशल बुद्धिमत्ता असलेली स्त्री पहावयास मिळते.

परिस्थितीतून शहाणपण आलेली सुंद्रा वाचकांच्या मनाचा ठाव तर घेतेच पण सुंद्रासारख्या कणखर व्यक्तिमत्त्वाची सुयोग्य छाप पडल्याशिवाय राहात नाही. लेखकाने सुंद्राचे पात्र रेखाटून खरेतर परिस्थितीने खचून जाणाऱ्या स्त्रियांनी नेमकी आपले जीवन कसे यशस्वीपणे शेवटपर्यंत नेले पाहिजे. हाच धडा सुंद्राच्या रुपाने दिलेला दिसतो.

- **गणपती**

'अधिवास' कादंबरीतील सुंद्राचा मोठा चुलता गणपती आहे. म्हटले तर सुंद्राचा बाबा देखील आहे. गणपती हा आपल्या चार भावांपैकी सर्वात लहान आहे. आपल्या शरीराचने अवाढव्य असणाऱ्या भावांना व त्यांच्या बायकांना हुशार गणपती सांभाळत असे. त्यांना अन्न पाणी कमी पडू नये याची काळजी घेत असे. सदैव जागृत राहून आपल्या भावांना शहाणे होऊ देत नसे. स्वतः मात्र अडाणीपणाचा आव आणून हुशारीने कुटुंबाची जबाबदारी घेत होता. सर्वांना आपलेसे करत होता. अशाप्रकारे संसाराचा कारभार दुसऱ्याच्या हाती न देता, सगळयांना सांभळून घेत निश्चिंतपणे त्याला संसार करायचा होता. संसाराचा पाया अशा पद्धतीने आखला होता की भावांना काय पाहिजे.... भाकर आणि काम हे त्याने ओळखले होते. एक नाही दहा चकरा शेताला आणि घराला तो करीत होता. पण भावांना उपाशी ठेवत नव्हता. स्वत: समोर बसून अर्धी भाकर जादा खायला घालत होता. जशी भावाची बुद्धी त्यांनी ओळखली होती, तसेच त्यांच्या पोटाचा मापही त्याने काढला होता. कोणी कमी खात असेल तर दुधात भाकर कुस्करून त्याच्यापुढे ठेवत होता. घरात बायांनाही तो तशीच वागणूक देत होता. कितीबी भाकर भाजा पण काम करा. सर्वच बायका या गरीबाघरच्या असल्याने व कोणीही विचारपूस करीत नसल्याने बायाही बिनबोभाट त्याचे ऐकत होते आणि पडेल ते काम करत होते. दिवसाला चकवा देऊन गणपती एक डुलकी घेत असे आणि रात्रभर घरातून शेतात, शेतातून घरात करीत असे. गणपती स्वतःचा खरा स्वभाव लपून ठेवीत असे आणि गावातील लोकांबरोबर चागले वागून किंवा वेळ प्रसंगी त्यांना मदत करून त्यांची सहानभूती मिळवत होता पण समोरच्याला सावध होऊन देत नसे. असा हा गणपती आपल्याकडे असणाऱ्या धनधान्याचे कुणाला थांग पत्ता लागू देत नव्हता.

गणपतीच्या मनातल्या भावना व्यक्त करण्याचे एकमेव ठिकाण म्हणजे शेतातील चिंचेचे झाड असे. गणपतीच्या मनातील गुंतागुंत चिंचेच्या झाडाजवळ व्यक्त होत असे. रान ताब्यात ठेवून कोणत्याही झाडाझुडपांना वाढू न देणारे या चिंचेच्या झाडाप्रमाणे तो कपटीप्रमाणे वागत असे. गणपतीकडे घोडा होता. वर्षा-दोन वर्षाला येणाऱ्या पोलीस पाटलाला दारातील घोडा देऊन गणपती शर्मिंदा करीत असे.

अशा पद्धतीने त्याने स्वतःच्या जीवनाची आखणी केली होती. हा गणपती गावात कुणबी म्हणून मोठा तर होताच पण पैसे त्यातही दाबून होता. पण चेहऱ्यावर तसे न दाखवता गावातील प्रत्येकाचं मोजमाप काढत होता. हणुमंता असो की पाटील यांच्याशी आतून मात्र संधान ठेवत होता. जेणेकरून आपण सुरक्षित राहावे. असा हा गणपती जपून पाऊले टाकत होता.

"कुणाला काय पाहिजे? हे जसं त्याला अचूक माहिती होतं.... तसं कुण्या वावराला... कुण्या मढीला किती ओट्या? किती ? मुठ्या बी पडेल तेबी त्याला माहीत होतं"(पृष्ठ. क्र.२७)

वर्षाभराचा धान्याचा व तेल-मिठाचा साठा अंधारकोठडीत भरून ठेवीत असे. लोकांना मात्र काहीच झाले नाही. असे सांगत असे. हातात येणारा पैश्याचा अंदाज तो कुणाला लागू देत नव्हता आणि आपल्या भावांनाही काही कमी पडून देत नव्हता. आपल्या जायदादीमध्ये सुंद्रा वाटेकरी होईल म्हणून हा कपटी गणपती सुंद्राचे लग्न लावून देतो. पण काही दिवसातच विधवा झालेली सुंद्रा माहेरी येते आणि वयात आलेली सुंद्रा आता त्याला अडगळ वाटू लागते. एकदा का सुंद्राचे लग्न केले तर सगळीच जायदाद आपली होईल या विचाराने तो जीवनाचे आराखडे आखत होता. आणि तसे वागत होता. म्हणूनच त्याने सुंद्राच्या दुसऱ्या लग्नाचा विचार करून तिचे दुसरे लग्नही लावतो. पण दुर्भाग्याने लहान मुलीला घेऊन माहेरी आलेल्या विधवा सुंद्राला पाहून गणपतीचा जीव कासावीस होतो. माहेरी आलेली सुंद्रा शहाणी बनून संसारात आणि गणपतीला वडील म्हणून जातीने लक्ष देत असे. गणपतीला सर्वात भीती कुणाची होती तर सुंद्राच्या अबोलपणाची, सोशिकपणाची, चांगुलपणाची. तो मनात म्हणत असे,

"पोरीला माझ्या मनातलं सगळं कळते: पण बोलत नाही... कुणाच्या विश्वासावर ती अबोल झाली? जर ती तोंड उघडली तर..." तिचा थंडपणाच भितीदायक झाला. (पृष्ठ क्र.72)

या विचाराने त्याचा थरकाप उडत असे. पुढे सुंद्राच्या पोरीचे लग्न झाल्यावर सुंद्रा लेकीकडे वाघोटी गावाला निघून जाते आणि कालांतराने मुलगी मन्याची मुलगी पद्मिनीचे लग्न आपला चुलता गणपतीच्या नातवाबरोबर करायचा प्रस्ताव ती गणपतीसमोर ठेवते. पण मोठ्या ईर्षेने तो तिला नकार देतो.

कपटी, अंहकारी एक प्रकारे खलनायकाच्या रूपात गणपती लेखकाने चित्रित केला आहे. तसेच वरवर चांगला वाटणारा गणपती आतून मात्र डाव खेळणारा दिसून येतो. याच कपटी गणपतीला शेवटी त्याच्याच मुलाने खोलीत डांबून ठेवल्याचे दिसते.

कादंबरीत वेळोवेळी त्याचे अंतर्मन स्वकथनातून व्यक्त होते आणि त्याच्या कपटीपणाचा अंदाज वाचकांना सहज लावता येतो. एकंदरीतच गणपती हे वाचकांसमोर लेखकाने ठाशीवपणे रेखाटला आहे.

- **रंगुबाई**

कादंबरीची नायिका सुंद्राची आई 'रंगुबाई' आहे. रंगुबाई ही शेतात कष्ट करणारी, घर सांभाळणारी पडेल ते काम करणारी एक कुटुंबवत्सल स्त्री आहे. आपल्या लेकीच्या लग्नाचे तिला कौतुक आहे. म्हणून ज्या वेळेस ती लग्न करायला निघते. तेव्हा सुंद्राला नऊमाशाची नथ मोठ्या प्रेमाने देते. आणि येणाऱ्या- जाणाऱ्याला अभिमानाने सांगत असते.

रंगुबाईच्या रूपाप्रमाणेच सुंद्रा सुंदर होती. रंगुबाईची सावली होती रंगुबाईच्या कानाजवळचा मोस सुंद्राच्या गालावर आला होता. आपल्या दुसऱ्या लग्नाच्या वेळी सुंद्राला समजावताना ती म्हणते, "गाव काय दूर नाही... एका दिसाची वाट... माणसंही आपल्यासारखीच.. पण मुलूख तेलंगाणी... बोलणंचालणं आडवं तिडवं...." पृष्ठ क्रमांक 33

अशाप्रकारे आपली लेक सुंद्राला एकप्रकारे समजावताना उभारी देताना दिसते.

जेव्हा सुंद्राचे रामचंद्र पाटलाचा भाऊ अप्पादाबरोबर लग्न होते. तेव्हा काळजीने भेटण्यासाठी वड्यावर येते. जावई अप्पादाचा उदासीनपणा पाहून तिच्या मनात कालवाकालव होते आणि लेकीच्या गळयात पडून म्हणते,

"माय सुंद्राऽ कारभाऱ्यांनं तुझ्या जन्माचं वाटोळं केलं.. कोरड्या खुटाला बांधलं."(पृष्ठ.क्र.४१)

आपल्या मुलीच्या लग्नाच्या खेळी केलेली पाहून तिच्या मनातील गणपती कारभारी हा उतरतो. तरीही हे सगळं मनात घेऊन ती कामुनी गावात येऊन चौघा-भावांच्या कुटुंबात व्यवस्थित संसार करताना दिसते. आपली सल मनात घेऊन ती वावरत असल्याचे दिसून येते. व त्याचा थांगपत्ताही कुणाला लागू देत नाही हे तिचे कसब आपल्याला पाहायला मिळते. एकंदरीतच परंपरागत रुढीला जखडलेली सर्व रितीरिवाज पळून शेतात राबणारी, कष्ट करणारी, पडेल ते काम करून संसारात रममाण असणारी स्त्री रंगुबाईच्या रूपाने आपल्याला पाहावयास मिळते.

- **नरसिंगा**

सुंद्राचा बाप 'नरसिंगा' आहे. नरसिंगाला सुख म्हणजे काय दुःख म्हणजे काय हे माहीत नव्हते. आपण सुखाच्या गावी आहोत का दुःखाच्या गावी आहोत की आपण या गावाचे नाही आहोत असेच त्याला वाटायचे. एकूणच त्याला जीवनाबद्दलचे भान नव्हते.

नरसिंगाच्या पोटाची भूक मोठी होती. गणपती कारभारीने घेतलेला घोड्याला चारा-पाणी करून हवे ते काम करून आपल्याला पोटभर खायला मिळते. यावरच तो खुश होत असे. गणपतीच्या डावपेचाला तो ओळखत नव्हता. किंवा त्याकडे तो लक्षही देत नव्हता. आपल्या पोटाची भूक शमवण्यासाठी पडेल ते काम तो निमूटपणे करत होता.

असा हा नरसिंगा आपल्या मुलीची सर्व जबाबदारी भाऊ गणपती कारभाऱ्यावर आहे असे मानून चालत होता. कधी कधी त्याला आपल्या भावाचा राग देखील येत होता परंतु घराचा कर्ता-करविता आपला गणपती कारभारी आहे म्हणून शांत राहून तो वाट चालत होता. येणाऱ्या छोट्या संकटाला तो घाबराघुबरा होत होता. तर कधी गणपतीला बिनधास्तपणे म्हणतो,(अर्थात मनात)

"च्या मायीचाऽ गण्या कारभारीऽ मला पोलीस धरून बंड्ची पुलीच्याच्या तळयात टाकावं म्हणून पाठवला होता...तिथून वाचलो होतो आता वाऱ्यानं उडून जातोय..."(पृष्ठ क्र.२२) असा त्याचा त्रागा होतो.

तर कधी छोट्या छोट्या गोष्टींना तो घाबराघुबरा होतो.आणि आपल्याबद्दल वाईट झालेल्या घटनांना तो हो गणपतीलाच दोषी ठरवताना दिसतो. कधी अवकाळी पावसाने विजांच्या कडकडातानेही घाबरून आपल्या भाऊ गणपतीला शिव्या देताना दिसतो. असा हा घाबरट, शेळपट नरसिंगा भुताचं नाव काढताच कावराबावरा बघत राहत असे. असा हा घाबरट जीवनाच्या डावपेच माहीत नसलेला, साधा-सरळ आणि आपल्या पोटाची भूक भागते एवढीच समाधानी वृत्ती ठेवणारा नरसिंगा हे पात्र थोडक्यात अतिशय उठावदारपणे लेखकाने रेखाटलेले आहे.

- **देवराव**

सुंद्राचा पहिला पती हा 'देवराव'. हसण्या-बागडण्याच्या वयातच लहान देवरावबरोबर सुंद्राचे लग्न झाले. हिप्परग्याच्या नवनाथ पाटलाचा मुलगा देवराव.

लग्नाच्या वेळेस घोड्यावर उतरल्यावरच शिदोरी सोडायचा. स्वत:च्या हातात एक करंजी घेऊन सुंद्राच्या हातात एक करंजी द्यायचा. आणि तिच्याबरोबर बाहेर खेळायला जात असे. पीराच्या सणाच्या दिवशी दोघेही बेभान होऊन खेळाचा आनंद लुटत असे. महिना-पंधरा दिवस तरी खेळ अंगातून जात नसे. असा देवराव सुंद्राचा सोबती होता.

"कमरेला धोतराचा फाटकंतुटकं पान, अंगात विनबाह्यांची बंडी, केसात लिखा-वा, नाकात शेंवूड, हातापायाच्या बोटाच्या पेऱ्यात खरूज." (पृष्ठ.क्र.२१)

कांदबरीत आलेले हे देवरावचे वर्णन हे देवराव लहान असल्याचे कळते. सुंद्राही त्याला साजेशी होती. देवरावला मात्र महिना पंधरा दिवसात खेळता खेळता तोंडाला फेस येऊन फिट येत होती.

एका सकाळी सुंद्राला दररोज सकाळी खेळायला चल म्हणून अंथरुणातून गुदगुल्या करून उठविणारा देवराव दिसेनासा होतो. सुंद्रा कावरीबावरी होते. सुंद्राची सासु देवरावऽ देवरावऽ करत हंबरडा फोडते. साऱ्या शिवारात शोधाशोध होते. आडात पडून देवरावचा मृत्यू होतो.

अशाप्रकारे लहानग्या देवरायांचा दुर्दैवी अंत होतो. लेखकाने सुंद्राचा पहिला नवरा देवरावसारखा अल्लड आणि त्याचे अवखळ खेळण्या-बागडण्याच्या रूपाचे अतिशय प्रभावीपणे चित्रण केले आहे. त्याचा दुर्दैवी अंत ही शोकांकिता आहे. सुंद्राच्या आयुष्यातील हा पहिला धक्का मन हेलावणारा आहे.

- **रामचंद्र पाटील**

'रामचंद्र पाटील' हा गावचा पोलीस पाटील होता आणि कादंबरीची नायिका सुंद्राचा मोठा भाया आहे.

"रामचंद्र पाटलाचा काळाशार वर्ण...पाषाणागत स्तब्ध! पुढ्यात पानाच्या सरंजामचे भरलेलं पानदान... बाजूलाच तंबाखूच्या आकड्यांनी भरलेली परडी. कानात सोन्याची भिकबाळी... थोड्याशा चेहऱ्यावरील देवीच्या व्रण."(पृष्ठ क्रमांक३२)

असे हे रामचंद्र पाटलाचे पात्र लेखकाने अतिशय कमी आणि थोडक्या शब्दात कौशल्यरीतीने उभे केले आहे. रामचंद्र पाटील हा गावचा पोलीस पाटील होता. तर त्याचा दुश्मण कुलाकडगी पाटील आहे. एकेकाळी

या दोघांच्या बापाने इंग्रजांच्या निजामाच्या मुलखात दरोडे टाकून निजामाच्या मूलखात लपायचे. पैशाच्या वाटणी वरून दोघांत वितुष्ट आले आणि कुलाकडग्याच्या बापाने रामचंद्र पाटलाच्या बापाला ठार मारले. पुढे रामचंद्र पाटलाने त्याला ठार मारून हे सुडाचे चक्र पूर्ण केले. त्यासाठी दोघांनीही तुरुंगावास भोगला होता. पुढे दोघेही एकमेकांना खून करण्यासाठी मदनुरच्या वाटेवर, शेतशिवाराच्या वाटेवर एकमेकांच्या पाळतीवर होते. आपला वडील भाऊ अप्पादाची बायको पोचव्वा तेलंगी निघून गेली होती. संसाराबाबत उदासीन असणाऱ्या आपल्या भावाची त्याला काळजी वाटत होती. त्याची पत्नी महालनबाईही त्याला पतीचा हक्क देत नव्हती. अशा भाव-भावनांचा गुंता मनात घेऊन रामचंद्र पाटील वावरत होता.आपल्या भावाच्या उदासीन वागण्यामुळे पोचव्वा तेलंगी निघून गेली होती,हे सत्य त्याला कसे सांगावे, तर 'मला दुसरी बायको करून दे!' असा तगादा अप्पादाने लावल्याने तो चिंतेत असे. त्यात कुलाकडगीचा मुलगा त्याच्या मागावर होताच.

खरेतर धाडसी रामचंद्र पाटलाला मृत्यूची भीती नव्हती. मृत्यू तर त्याला कानातील भिकबाळी एवढा जड वाटत नव्हता. मृत्यू तर कोणत्याही रुपात येऊ शकतो असे त्याला वाटत होते पण हीनदीन होऊन मरण स्विकारणे त्याला पसंत नव्हते. त्याने मोठ्या कलेने कुलाकडगी बापाचा खून केलेली कुऱ्हाड लमाणी लछ्याच्या च्या बापाच्या हाती देऊन कबुली जबाब द्यायला लावला. इतका तो जीवनाच्या डावपेचात तरबेज होता. त्याची पत्नी महालनबाई मात्र त्याला खिजवत असे. अप्पादादा कसा असला तरी त्याची काळजी त्याला होती. वडील भाऊच्या निधनानंतर रामचंद्रपाटील एकटा पडला होता. त्याचे रामचंद्र पाटलाला खूप मोठे दुःख होते. रामचंद्र पाटलाचा डोळ्यावर उदासीनता आली होती. पतीच्या निधनानंतर परमुलखातील सुंद्रा वाड्यात मुलीला वाड्यात आपले अस्तित्व टिकवून आहे. याचा रामचंद्र पाटलांना अभिमान होता.

असा हा रामचंद्र पाटील मनात अनेक विचारांचे वारूळ घेऊन चालत असलेला सुंद्राच्या मुलीबरोबर लहान होऊन खेळताना दिसतो. असा हा करारी, धाडसी, भावूक रामचंद्र पाटलाचे रूप आपणास पहावयास मिळते. एका रात्री रामचंद्र पाटलाचा वाड्यात खून होतो आणि त्याचा दुर्दैवी अंत होतो. लेखकाने रामचंद्र पाटलाचे पात्र अत्यंत प्रभावीपणे चितारलेले आहे

- **अप्पादादा**

कादंबरीची नायिका सुंद्राचा दुसरा पती 'अप्पाराव' आहे आणि रामचंद्र पाटलाचा भाऊ आहे. अप्पाराव रात्रंदिवस शेतावर जनावरांचे राखण करीत असे.

डोक्याला लाल काड्याचं रुमाल गुंडाळलेलं... अंगात बंडी...कमरेला दोन टांगी धोतर...चेहरा गढूळ पाण्याच्या डबक्यासारखा....(पृष्ठ क्र.३४) असा अप्पादादा संसाराच्या बाबतीत उदासीन होता. अप्पादादाच्या वागण्याला वैतागून पहिली बायको पोचव्वा तेलंगी माहेरी निघून गेली होती.

तो आपला भाऊ रामचंद्र पाटलाला दुसरे लग्न लावून देण्याचा आग्रह करीत असे. तो भाऊ रामचंद्र पाटलाला म्हणतो,

की " आंण तर बायको आणऽ नाहीतर रुसून घरी झोपतो." (पृष्ठ. क्र.३५)

रामचंद्रपाटील एकदा घोड्यावर बसला की बायको आणणार हे अप्पदादाला माहित होते. सुंद्रा ही त्याची दुसरी पत्नी म्हणून त्याच्या आयुष्यात येते. संसाराबाबत उदासीन असलेला अप्पादा पंधरा दिवसाआड वाड्यावर येत असे.

एका रात्री नवविवाहित पत्नी सुंद्रा धाडस करून अप्पादादाला म्हणते,

"नदीच्या तोंडात रोज झोपताव.. वाड्यावर झोपत जावा कीऽ" (पृष्ठ क्र.३५)

आपल्या पत्नीच्या प्रश्नावर तो म्हणतो, रानातल्या जित्रापाबरोबर तुझा बाप झोपणार आहे का? रामचंद्र झोपला तर कुलाकडगी त्याला ठार मारणार नाही का?" असे उत्तर देतो. (पृष्ठ. क्र.३५)

यावरून त्याला आपल्या भावाची काळजी असल्याचे दिसून येते. त्याचबरोबर आपल्या पहिल्या बायकोप्रमाणे सुंद्राही आपल्याला सोडून निघून जाईल याचीही चिंता त्याला असल्याचे जाणवते. अप्पाराव व सुंद्राला मुलगी होते. मुलगी झाल्यापासून तो रोजच वाड्यावर येत असे. अशातच नदीला पूर येतो आणि जागलीवरचा अप्पादादा पुराच्या पाण्यात जनावरांबरोबर वाहून जातो आणि अशाप्रकारे अप्पादादाचा दुर्दैवी अंत होतो. लेखकाने अतिशय कौशल्याने सुंद्राचा दुसरा पती अप्पादादाचे व्यक्तिचित्र थोडक्यात आणि परिपूर्ण रेखाटले दिसून येते.

- **मन्या**

सुंद्राची मुलगी 'मन्या' आहे. मन्या ही आपल्या आईप्रमाणे सुंदर काळी-सावळी आणि भरल्या अंगाची मोहक आहे. वयात आलेल्या मन्याचे तीस-पस्तीस वर्षांनी मोठा, आडदांड जयवंतराव पाटलाबरोबर लग्न होते. तेव्हा वाघोटी गावचे मुऱ्हाळ अजून आले नाही म्हणून मन्याची आई सुंद्रा तिला भेटण्यास वाघोटी गावाला येते. आपला पती जयवंतराव पाटलाच्या उदासीन वागण्याला मन्याचे आई चिंतित झालेले दिसते. खचलेल्या मन्याला आपल्या आईचा फार मोठा आधार वाटतो. आई सुंद्राची खंबीरपणे साथ असल्याने ती आपल्या संसाराचा सगळा भार आईवर सोपवून मोकळी होते. अशातच मन्याचा पती जयंतरावाचे आग्या मोहोळाच्या माश्या चावल्याने मृत्यू होतो. तेव्हाही खचून गेलेल्या मन्याला आईचा आधार असतो. मन्या सर्व दुःख विसरून आपल्या आईच्या पावलावर पाऊल टाकत दररोज शेतात जाते व सगळी जबाबदारी घेताना दिसते. आपल्या पदरात असलेल्या दोन मुलांचा विचार करत नारायण आणि पद्मिनी यांना पाहून ती जीवन जगताना दिसते आपल्या आईच्या साथीने ती खंबीर पाऊल टाकते. तर कधी पतीच्या आठवणींनी गहिवरून येऊन आईच्या कुशीत जाऊन मन मोकळ करते.

कधी अपरात्री उठून आपल्या आईला म्हणते,

"माय ते बोलत नव्हते; पण त्यांना सगळं कळत होतं..."

पुढे ती म्हणते,

मी नवरा म्हणून जवळ जात होते. तेवढे ते दूर जात होते..

लेकराचंही असंच... बाप म्हणून जवळ गेलं तर.. परक्यासारखं दूर लोटत... 'जायाचं' त्यांना माहीत होतं... आपण गेल्यानंतर नवरा म्हणून... बाप म्हणून... कुणी आठवण काढून दुःखी होऊ नये... असंच वागत होते... मन्याला समजावताना सुंद्रा म्हणते, "तसं माणसाला कळतं का नकळत.(पृष्ठ. क्र.१८५)

एकदा मन्या एकटी घरी असताना गुलाबराव पटवारी विधवा मन्याचा हात धरतो. धिराची मन्या हात झिडकारून त्याच्यावर चप्पल उगारते. विधवा झालेल्या मन्याला या जगातील वाईट नजरांच्या माणसांना तोंड द्यावे लागत आहे पण आपल्या आईच्या पावलावर पाऊल टाकणारी मन्या आईचाच आदर्श घेऊन आपल्या शीलाला धक्का लावू देत नाही. एखाद्या वाघिणी प्रमाणे तुटून पडताना दिसते आणि आपल्या आईचा मान राखताना दिसते.

अशी ही सुंद्राची मुलगी मन्या सुंद्राच्या अंत्यसमयी पर्यंत तिच्याजवळ राहून धीर देताना दिसते. मन्या आपल्या आईमध्ये स्वत:चे रूप पाहताना दिसते आणि तिचा आदर्श घेताना दिसते.

वातावरणनिर्मिती :

'अधिवास' या कादंबरीत सुंद्राच्या माहेरचे कामुनी गावचे वर्णन थोडक्यात आणि उठावदार आलेले आहे.

"कामुनी गाव म्हणजे धुक्याचं... कोन कुणाला देईल सांगता येत नाही. प्रत्येकजण दुसऱ्याच्या मागावर... खरं मागे ठेवून खोट्यावर बोलणारे... कामुनीची विहीर जेवढी खोल... गाळपाण्याची... तेवढीच माणसे खोल... आणि जड! दिसायला जड शीळ पाषाणागत पण डोक्याने आणि नको तेवढी पावक....! म्हणूनच इथल्या सासुरवाशींनीना इथं बसून माहेरचं कळायचं: पण बगलेत झोपलेल्या नवऱ्याचं कळायचं नाही."(पृष्ठ क्र. ६४."

तर सुंद्रा जेव्हा रामचंद्र पाटलाच्या वाड्यात सून म्हणून येते त्या वाड्याचे स्वरूप वातावरणनिर्मिती लेखकाने अतिशय कौशल्यपणे रेखाटले आहे.

"काळ्या दगडाचा चौपासी वाडा. तेल पिलेले सागवानी खांब. तिनी बाजूंनी पुरुषभर उंचीचा जोता. त्यामध्ये माल साठरविणाऱ्या अनेक कोठ्या... दाराच्या चौकटीवर पितळेच्या फुल्या.. जोत्याच्या खांबावर कोरलेली राघव... वेली.. सारेच बांधकाम मिळविलेल्या चुन्या दगडात! देवघराच्या खालच्या बाजूला धान्याचे बळद... हल्याच्या लगडीवर आणलेले पाणी साठवण्यासाठी बांधलेले हौद... लागूनच न्हाणीघर... मोठ्या दरवाजाच्या डाव्या बाजूला देवडी आणि त्यावर कोर्टकचेरीसाठी ये-जा करणारा घोडा... उजव्या बाजूला दाराला लागूनच रामचंद्र पाटलाची माय... धानवा होऊन बसलेली. मधल्या घराच्या लोखंडी गजाळीतून हात घातलं तर पुराचं पाणी हाताला लागे. नदीच्या प्रवाहाचा धीरगंभीर आवाज वाड्यात घुमत राही."पृष्ठ क्र.३३

- **भाषाशैली:**

'अधिवास' मधील भाषाशैली अतिशय अलंकारिक, अर्थवाही, चित्रदर्शी व प्रभावी आहे. कादंबरीतील स्त्री वर्णन आणि पुरुष वर्णन आणि निसर्ग वर्णन अतिशय प्रत्ययकारी व वाचकाच्या डोळ्यासमोर जशीच्या तशी उभे करणारे आहे. त्यामुळे त्यांच्या कथानकाचे सातत्य प्रवाही होते. तसेच या कादंबरीत बाबू बिरादार हे प्रतिभा आणि प्रतीकांचा माध्यमातून कमीत कमी शब्दांमध्ये फार मोठा आशय व्यक्त करतात. असे असूनही प्रतिभा प्रतिभा आणि प्रतीके अलंकारिक शब्द यांची सरमिसळ न करता कथानकाच्या अभिव्यक्तीत जराही धक्का लागत नाही. कथानक प्रभावीपणे वाचकांच्या मनाचा ठाव तर घेतेच पण लेखकाच्या ठिकाणी असणाऱ्या समृद्ध भाषेच्या ज्ञानाचा सक्षम अधिष्ठानाचा ही प्रत्यय येतो.

बाबू बिरादार ह्यांच्या 'अधिवास' या कादंबरीतील काही अलंकारिक विधाने पुढीलप्रमाणे...

१. बारमबाईच्या विहिरीच्या पाण्याची तिरीप घोड्याच्या फुटक्या डोळ्यावर पडली. पृष्ठ. क्र. ९
२. हातातील सर्पाकृत काठी बुंध्याला टेकविला पृष्ठ. क्र. १७
३. चंद्रकमळाच्या पाकळ्या किंचित उघडल्या. पृष्ठ. क्र. ३२
४. जमिनीवरचं पाणी सर्पाच्या चपळाईने वाट मिळेल तिकडे धावू लागलं पृष्ठ. क्र. ५०
५. पाहता पाहता संसार आषाढातल्या पाण्यासारखा चढू लागला. पृष्ठ. क्र. ८४
६. काळी चंदनाची काडी सरकावी तशी सुंद्रा पांढऱ्या पडत चाललेल्या वाटेवरून चालू लागली. पृष्ठ. क्र. १२५
७. उद्याच्या सूर्यदेवासाठी सजलेलं प्रकाशाचं गाव आहे. पृष्ठ. क्र. १४८
८. उंटाच्या मदारीसारखी अकराच्या मालाची उतरण. पृष्ठ. क्र. १५४

- **'अधिवास'** या कादंबरीतील केरबा महाराजांच्या मुखातून खालील अभंग आला आहे.

१. 'अनंत ब्रह्मांड उदरी हरी हा बालक नंदा घरी
नवल केवढे केवढे न कळे कान्होबाचे कोडे' पृष्ठ. क्र.१४४

- **'अधिवास'** या कादंबरीतील काही वाक्प्रचार- खोड मोडणे, ध्यानमग्न होणे,अनमान करणे, स्वाधीन करणे,
- **तर 'अधिवास' या कादंबरीमध्ये**

१. 'ज्या गावच्या बोरी त्या गावच्या बाभळी.' पृष्ठ. क्र. ८७

२.'सौ सोनार की.... एक लोहार की.' पृष्ठ. क्र. ८९

३.' शेळीचे कान गोसाव्याच्या हाती.' पृष्ठ. क्र. १०१

४.'वाळव्याबरोबर ओलंही जाळायला लागतं.' पृष्ठ. क्र. २६

५.'मी मोठा होण्यासाठी लहान होतो.' पृष्ठ. क्र. ७०

६.'देवाची करणी नारळात पाणी.' पृष्ठ. क्र. १३९

७.'नाचता येईना... तिला अंगण वाकडे.' पृष्ठ. क्र. २४२

- **निरीक्षणे:**

१. या कादंबरीमध्ये कन्नड, मराठी, तेलगु भाषेची सरमिसळ असलेली आपल्याला दिसून येते.

२. 'अधिवास' मध्ये वापरलेली कथन पद्धती आणि कादंबरी निवेदन या दोहोंचा कौशल्याने अन्वय साधून लेखकाने प्रभावीरित्या मांडणी केलेली दिसून येते.

३. या कादंबरीमध्ये कथानक, भाषाशैली, निवेदन इत्यादी बाबत निश्चित वेगळेपण दिसून येते.

४. अल्पाक्षरी रमणित्व भाषा आणि वास्तवाची की सुजाण जाण हे बाबू बिरादार यांचे सामर्थ्य प्रत्ययास येते.

५. एकाच घरातील तीन पिढ्यांतील स्त्रीयांच्या वाट्याला आलेले दु:ख सारखेच वाटते. स्त्रीयांच्या मनातील भावनांचा गुंता रंगुबाई, सुंद्रा, मन्या, पद्मिनीच्या रूपाने या कादंबरीत प्रभावीपणे अभिव्यक्त झालेला आहे.

६. वास्तवातून साकारत जाणाऱ्या माणसांच्या भावभावनांच्या पिळदार जीवनाचे चित्र बाबू बिरादार ह्यांनी 'अधिवास' कादंबरीतून विलक्षण ताकदीने साकारलेले दिसून येते.

मूळग्रंथ:

१) बिरादार बाबू (मूळ कादंबरीकार) , **'अधिवास'**, गणगोत प्रकाशन, देगलूर, प्र. आ.२६ सप्टें. २०२१.

संदर्भ ग्रंथ:

१. यादव आनंद , 'ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या', मेहता पब्लिकेशन हाऊस,पुणे,द्वी.आ.जुलै १९९३.

२. यादव आनंद , 'ग्रामीणता साहित्य आणि वास्तव', मेहता पब्लिकेशन हाऊस,पुणे,१९७९.

३. हस्तक उषा, 'कादंबरी आणि मराठी कादंबरी, साहित्यसेवा प्रकाशन,औरंगाबाद,प्र.आ.१९९७.

४. संपा. मोकाशी सयाजीराजे, 'ग्रामीण साहित्याचा इतिहास' स्नेहवर्धक प्रकाशन,पुणे प्र.आ.३ मे २०१५.